N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0151 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/02/2019 18:55 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 25/02/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2019

**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/02/2019 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 036 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2019 18:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** · लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सोलापूर महानगर पालिका,प्रशासकीय इमारतीच्या दरवाज्या ,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. ***Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):***

(a) ***Name (नाव):*** रमेश बालस्वामी गुडेमल्लू

(b) **Father's Name (वडील का नाव) :** बालस्वामी

(c) ***Date/Year of Birth (जन्म*** 1987 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सत्य साई नगर ,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गेंटयाल टकीजचे मागे ,सत्य साई नगर ,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9067013003

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नागेश शिवहार वेदपाठक | | वडील का नाम : शिवहार वेदपाठक | 1. 55,चांदलक्ष्मी नगर,,शेळगी,सोलापूर, सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

जबाब दि 26/02/2019 मी रमेश बालस्वामी गुडेमल्लू वय 32 वर्षे ,व्यवसाय नोकरी,ड्रेसर,आरोग्य विभाग सोलापूर , महानगरपालीका सोलापूर,रा गेंटयाल टकीजचे मागे सत्य साई नगर सोलापूर,जि.सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब दितो की,मी वरील ठिकाणी माझे आई व पत्नी मुलासह राण्यास असुन मी व माझी आई दोघेजण सोलापूर महानगरपालिका येथील आरोग्य विभागामध्ये नोकरीस आहोत.त्यावर आम्ही आमचे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.माझे आई गोविंदाम्मा बालस्वामी गुडेमल्लू या आरोग्य विभागा मध्ये सफाई कर्मचारी म्हणून कामास आहेत. त्यांची मूळ नेमणूक ही साबळे प्रसुति गृह येथे आहे. परंतू महानगर पालिका कडून तिची नेमणूक ही मदर तेरेसा हस्पिटल येथे करण्यात आलेली आहे. परंतू आई गोविंदम्मा हिला कंबर व गुडगे दुखीचा त्रास असल्याने तिने तिची नेमणूक ही मुळ नेमणूक साबळे हस्पिटल येथे करण्याबाबत दि.15/10/2018 व दि.21/01/2019 रोजी आरोग्य विभागात लेखी अर्ज केला आहे. सदरचा अर्ज हा आरोग्य विभागातील लिपिक श्री नागेश वेदपाठक यांच्या मार्फत पुढे पाठविला जाते. परंतू दोन वेळा अर्ज देवूनही लिपिक श्री नागेश वेदपाठक हे पुढील कार्यवाही साठी पुट-अप करीत नव्हते.त्यामुळे काल दि.25/02/2019 रोजी लिपीक वेदपाठक यांची भेट घेवून आईच्या अर्ज पुढे पाठविणे बाबत चर्चा केली असता त्यांनी माझ्याकडे 500/- रू लाचेची मागणी केली आहे. श्री वेदपाठक यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी दि. भेट घेवून 25/02/2019 रोजी अँन्टी करप्शन ब्यूरो,सोलापूर या कार्यालयात येवून तेथे श्रीमती कविता मुसळे,पोलिस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर यांच्या समक्ष तक्रार नोंदविली सदर तक्रारवर पुढील कार्यवाही करण्यासाठी श्रीमती मुसळे यांनी श्री अंकुशकर व श्री नागरगोजे दोघे नेमणुकी सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांना पंच म्हणून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी समंती घेण्यात आली. सदर उपलब्ध पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी श्रीमती मुसळे यांच्या सुचने नुसार मी पुन्हा पंचा समक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली तसेच सापळा अधिकारी श्रीमती मुसळे यांचे कडे मी दिलेली तक्रार दोन्ही पंचाना दाखविली त्यावर सोबतचे कागदपत्रावर दोन्ही पंचानी व श्रीमती मुसळे यांनी सह्या केल्या त्यांनतर श्रीमती कविता मुसळे,पोलिस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर यांनी मी दिलेल्या तक्राराची पडताळणी करण्याची ठरविले. त्यासाठी मी व माझ्या सोबत पंच नं-1 अंकूशकर यांना सुचना दिल्या की आम्ही सोलापूर महानगरपालिका येथील आरोग्य विभागात जावून तेथे श्री नागेश वेदपाठक यांची भेट घेवून त्यांच्याशी आईच्या अर्जाची कार्यवाहीबाबत चर्चा करावी.त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्या वेळात आणून देत असल्याबाबत सांगावे तसेत आम्हास व्हाईस रेकर्ड त्याविषयी माहीती दिली व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकण्यात आले.त्यानंतर पडताळणी बाबतच्यआ सविस्तर सुचना देवून मला व पंच अंकूशराव यांना सोलापूर महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यालया कडे माझ्या गळ्यात व्हाईस रेकर्डर शर्टाच्या आतील बाजूस अडकवून मोटार सायकल वरून पाठविले.त्यावरून मी व पंच नं-1 अंकूशकर राव यांच्यया समक्ष श्री नागेश वेदपाठक यांची भेट घेवून माझ्या आईच्या बदलीचा अर्ज पुट-अप



Scanned by CamScanner

करण्या बाबत चर्चा केली असता श्री वेदपाठक यांनी मला 500/-रू मागणी केली. त्यावरून मी व पंच अंकुशराव परत अँन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. तेथे श्रीमती कविता मुसळे,पोलिस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर.यांनी माझ्या गळ्यातील व्हाईस रेकर्डर काढून पंच उंकूशराव व मला हकीकत विचारून घेतली.त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर श्रीमती कविता मुसळे,पोलिस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर.यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये माझ्या व श्री वेदपाठक यांच्यात झालेले लंभाषण ऐकले.त्यामध्ये श्री नागेश वेदपाठक यांनी 500/-रू लोचेची मागणी करून ती रक्कम दि.26/02/2019 रोजी सकाळी आरोग्य विभागात घेवून नेण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले. त्याबाबत आपण दि.25/02/2019 रोजी सविस्तर पंचनामा करून मला व पंचाना दि.26/02/2019 सकाळी अँन्टी करप्शन ब्यूरोच्या कार्यालयात हजर राहण्याचे सुचना दिल्या. त्यावरून दि.26/02/2019 रोजी मी,दोन्ही पंच व सापळा पथक कार्यालयात आल्यानंतर श्रीमती कविता मुसळे,पोलिस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर.यांच्या सुचनेवरून मी श्री नागेश वेदपाठक यांना देण्यासाठी 500/-रू. 100/- रू.दराच्या पाच नोटा होत्या.सदर नोंटाना अँथ्रासीन पावडर लावण्याचा,त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूरच्या कार्यालयात करण्यात आला. त्यानंतर यातील श्री नागेश वेदपाठक यांच्यावर आरोग्य विभाग,सोलापूर महानगरपालिका येथे लाचेचा सापळा आयोजित केला.त्यामध्ये मी व पंच नं-1 अंकुशराव असे देघेजण माझ्या मोटार सायकल वरून व उर्वरित सारळा पथक शासकीय जीप क्रं-MH-13.BQ.0019 मधून सोलापूर महापालिकेच्या आवारात आलो.तेथे मी पंच नं-1अंकूशराव यांच्या सह प्रशासकीय इमारती मधील आरोग्य विभागाच्या कार्यालयात गेलो असता कार्यालयात श्री वेदपाठक हे हजर होते. परंतू त्यांच्याकडे जास्त लोंकाची गर्दी असल्याने आम्ही काही वेळ तेथे थांबून राहीलो.त्यामध्ये श्री वेदपाठक हे आयुक्त साहेबांच्या कार्यालया कडे जावून आले.त्यानंतर काही वेळाने मी वेदपाठक यांची भेट घेतली असता ते खुर्चीवरून उठून चालत बाहेर आले.प्रसासकीय इमारतीच्या दरवाज्या जवळ मी वेदपाठक यांना मी माझ्या आईचे तेवडे बघा असे म्हणाले. त्यावेळी त्यांनी हं हं करतो.असे म्हणून त्यांच्या उजव्या हाताची बोटे एकमेंकावर घासून माझ्याकडे लाचेची मागणी केली.त्यावेळी मी माझ्या शर्टच्या खिसामध्ये ठेवलेल्या लाचेच्या नोंटांची घडी उजव्या हातांने काढून श्री वेदपाठक यांच्या समोर धरली असता त्यांनी ती साचेची रक्कम डावे हाताने स्विकारून ती रक्कम पँन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली असता पंच अंकूशराव यांनी केलेल्या नियोजित इशार्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी येवून श्री वेदपाठक यांना रंगे हाथ पकडण्यात आले आहे. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष वेदपाठक यांचे दोन्ही हांताची पँन्टची अ.वा.दिव्याच्या निळ्या प्रकाशात तपासणी केली.असता त्यांचे डाव्या हाताच्या बोटांच्या पेऱ्यावर व अंगावरील नेसते पँन्टीच्या डाव्या खिशाच्या आतील बाजूस व तोंडास अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांच्याकडे मिळून आलेल्या नोटांची सापळा पूर्व पंचनाम्यात नमूद केलेल्ये नोंटाच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. तसेच सदर नोंटाची देखील अँ.वा.देव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करीता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली आहे.सदरच्या नोंटा व तक्रारदार यांच्या अर्जाच्या संदर्भातील कागदपत्रे पुराव्याकामी जप्त करण्यात आलेली आहेत. सदर बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा बाबत अँन्टी करप्शन ब्यूरो सोलापूरच्या कार्यालयात दि.26/02/2019 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक श्री नागेश शिवहार वेदपाठक,वय-54 वर्षे,लिपीक,आरोग्य विभाग सोलापूर महानगर पालिका,रा-घर नं-55,चांदलक्ष्मी नगर,शेळगी,सोलापूर.यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळवायचे त्या खेरीज लाच म्हणून माझ्या आईच्या बदलीचा अर्जाची फाईल पुढे पुट-अप करण्यासाठी दि.25/02/2019 रोजी 500/- रू लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम आज दि.26/02/2019 रोजी 13/00 वा. सोलापूर महानगर पालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दरवाज्या जवळ स्वत: स्विकारून सांपत्तीक फायदा मिळवून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे.म्हणून माझी श्री नागेश शिवहार वेदपाठक,वय-54 वर्षे,लिपीक,आरोग्य विभाग सोलापूर महानगर पालिका,रा-घर नं-55,चांदलक्ष्मी नगर,शेळगी,सोलापूर.यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहीला तो माझ्या सांगणेप्रमाणे बरोबर आहे. हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म. समक्ष
सही इंग्रजी.(कविता मुसळे)पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rajendra Haribhau Bahirat(I (Inspector)) / PCMH87938 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

Ramesh.

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अमलदार
सदर बझार पोलिस स्टेशन

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची सही)

Name (नाम): Rajendra Haribhau Bahirat
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PCMH87938

Scanned by CamScanner